## MAHARAS

THE MAHARASHTRA LEGI ... ACT, 1976.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अ ... त २९ डिसेंबर १९७६ रोजी मिळाली असल्यामुळे तो ... सिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. I OF 1977

### AN ACT TO PROVIDE FOR PAYMENT OF PENSION TO PERSONS WHO HAVE SERVED AS MEMBERS OF ANY STATE LEGISLATURE IN MAHARASHTRA

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ५ जानेवारी १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

### महाराष्ट्रात कोणत्याही राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून सेवा केलेल्या व्यक्तींना निवृत्तिवेतन देण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** महाराष्ट्रात कोणत्याही विधानमंडळाचा सदस्य म्हणून सेवा केलेल्या व्यक्तींना निवृत्ति-वेतन देण्याची आणि त्याशी संबंधित इतर बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्ता विसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व प्रारंभ.

(२) तो राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

२. संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास, या अधिनियमात,— व्याख्या.

(१) "राज्य विधान मंडळ सदस्य" म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य आणि त्यात पुढील सदस्यांचा समावेश होईल :—

(अ) मुंबई विधानसभा, मध्य प्रदेश विधानसभा किंवा हैद्राबाद विधानसभा यांपैकी कोणत्याही विधानसभेवर १९५२ साली, त्या विधानसभांच्या सर्व निर्वाचन संघांना सद-स्यांची निवड करण्याचे आवाहन ज्या सर्वात अगोदरच्या तारखेस करण्यात आले असेल

(त्यात यापुढे जिल्हा "उक्त तारीख" असे म्हटले आहे) त्या तारखेस किंवा त्यानंतर निवडून आलेला सदस्य—

(एक) जर तो सदस्य म्हणून असतानाच मुंबई विधानसभेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ अन्वये त्या विधानसभेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर ; किंवा

(दोन) जर तो सदस्य म्हणून असतानाच महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९६० अन्वये त्या विधानसभेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर ;

(ब) मुंबई विधानसभेचा त्या सभेवर उक्त तारखेस किंवा त्यानंतर नामनिर्देशित करण्यात आलेला सदस्य, असा सदस्य आपल्या सदस्यत्वाचा कालावधीत आता महाराष्ट्र राज्याचा भाग असलेल्या कोणत्याही क्षेत्राचा कायम रहिवासी असेल तर ;

(क) मुंबई विधानपरिषदेचा, उक्त तारखेस किंवा त्यानंतर त्या परिषदेवर निवडून आलेला, सदस्य—

(एक) जर तो सदस्य असतानाच मुंबई विधानपरिषदेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ अन्वये त्या परिषदेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर ; किंवा

(दोन) जर तो सदस्य म्हणून असतानाच महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य म्हणूनही चालू राहिला असेल किंवा राज्य पुनर्रचना अधिनियम, १९६० अन्वये त्या विधानपरिषदेवर निवडून आल्याचे मानण्यात आले असेल तर ;

(ड) मुंबई विधानपरिषदेचा त्या परिषदेवर उक्त तारखेस किंवा त्यानंतर नामनिर्देशित करण्यात आलेला सदस्य, असा सदस्य आपल्या सदस्यत्वाच्या कालावधीत आता महाराष्ट्र राज्याचा भाग असलेल्या कोणत्याही क्षेत्राचा कायम रहिवासी असेल तर ;

(२) राज्य विधानमंडळाच्या सदस्याच्या संबंधात "पदाची मुदत" म्हणजे असा सदस्य म्हणून त्याची निवड किंवा नामनिर्देशन यासंबंधीची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस सुरू होणारी आणि ते आसन रिक्त होण्याच्या तारखेस संपणारी मुदत.

स्पष्टीकरण एक.—विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली असेल आणि कोणत्याही कारणासाठी कोणत्याही मतदारसंघात निवडूक झाली नसेल आणि त्याच्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्या मतदारसंघात एखादा सदस्य निवडून आला असेल तर त्या सदस्याच्या बाबतीत, पदावधी हा, इतर मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल ज्या तारखेस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाला असेल त्या तारखेस सुरू झाला असे समजण्यात येईल.

स्पष्टीकरण दोन.—राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे मान्य केलेल्या कारणासाठी किंवा कारणांसाठी राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असेल त्या बाबतीत त्याच्या पदाच्या मुदतीची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी, त्याने राजीनामा दिला नसता तर जितक्या मुदतीसाठी तो सदस्य म्हणून राहिला असता ती मुदत जमेस धरण्यात येईल आणि त्याने त्या कालावधीसाठी देखील सदस्य म्हणून सेवा केली असे समजण्यात येईल :

परंतु असे की, तदनुसार विचारात घ्यावयाची कमाल मुदत ही कोणत्याही सदस्याच्या बाबतीत सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

सदस्यांना देय निवृत्तिवेतन.

३. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून पाच वर्षे मुदतीसाठी सेवा केलेल्या प्रत्येक सदस्याला दरमहा दोनशे पन्नास रुपये निवृत्तिवेतन देण्यात येईल. मग अशी सेवा (अशा प्रारंभापूर्वी झालेली असो किंवा नंतर,—ती खंडित असो किंवा नसो, तसेच तो राज्य विधानमंडळाच्या एकाच सदनाचा सदस्य म्हणून झालेली असो किंवा वेगवेगळ्या सदनांचा सदस्य म्हणून :

परंतु असे की, ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने पाच वर्षांपेक्षा जास्त मुदतीसाठी पूर्वोक्तप्रमाणे सेवा केली असेल त्याबाबतीत तिला पाच वर्षांपेक्षा जास्त मुदतीच्या प्रत्येक वर्षासाठी दरमहा रु. पन्नास या प्रमाणात जादा निवृत्तीवेतन दिले जाईल. तथापि अशा व्यक्तीस देय असलेले निवृत्तिवेतन हे कोणत्याही प्रकरणी दरमहा पाचशे रुपये यापेक्षा अधिक होणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी वर्षांची गणना करताना एखाद्या व्यक्तीने परिषदेच्या किंवा विधानसभेच्या आपल्या सदस्यत्वाच्या आधारे, विधानपरिषदेचा सभापती किंवा उप सभापती किंवा विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा मंत्री, राज्य मंत्री, उप मंत्री किंवा संसद सचिव म्हणून किंवा त्यापैकी एकापेक्षा अधिक पदांवर, ज्या मुदतीत सेवा केली असेल ती मुदत जमेस धरली जाईल.

**विवक्षित परिस्थितीत निवृत्तिवेतन स्थगित ठेवणे किंवा कमी करणे.**

४. (१) ज्यावेळी कलम ३ अन्वये निवृत्तिवेतनाचा हक्क असलेली कोणतीही व्यक्ती ही,—

(अ) भारताच्या राष्ट्रपतीच्या किंवा उपराष्ट्रपतीच्या पदावर निवडली गेली असेल किंवा एखाद्या राज्याच्या राज्यपालाच्या पदावर किंवा एखाद्या संघराज्य क्षेत्राच्या प्रशासकाच्या पदावर तिची नेमणूक करण्यात आली असेल तर ; किंवा

(ब) राज्यसभेचा किंवा लोकसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या विधानसभेचा किंवा एखाद्या राज्याच्या कोणत्याही विधानपरिषदेचा सदस्य झाली असेल तर ; किंवा

(क) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही महामंडळाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली वेतनावर सेवानियुक्त झाली असेल किंवा अशा सरकारकडून, महामंडळाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून कोणतेही पारिश्रमिक मिळण्यास इतर प्रकारांनी हक्कदार बनली असेल तर,

ती असे पद धारण करण्याचे किंवा असा सदस्य म्हणून असण्याचे अशा प्रकारे सेवानियुक्त असण्याचे किंवा अशा परिश्रमिकाची हक्कदार असण्याचे चालू राहिल त्या मुदतीत कलम ३ अन्वये कोणतेही निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्कदार असणार नाही :

परंतु असे की, ज्यावेळी असे पद धारण करण्यासाठी किंवा असा सदस्य म्हणून राहण्यासाठी किंवा असा सेवानियुक्त असण्यासाठी अशा सदस्याला देय होणारे वेतन किंवा खंड (क) मध्ये निर्देशिलेले पारिश्रमिक त्याला कलम ३ अन्वये देय होणाऱ्या निवृत्तिवेतनापेक्षा कमी असेल त्यावेळी अशा व्यक्तीस त्या कलमाखालील निवृत्तिवेतनाची बाकी रक्कम मिळण्याचा हक्क राहील.

(२) ज्यावेळी कलम ३ अनुसार निवृत्तिवेतनाचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील एखाद्या महामंडळाकडून किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाकडून कोणत्याही कायद्यानुसार किंवा अन्यथा कोणतेही निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क असेल तेव्हा—

(एक) अशा कायद्यानुसार किंवा अन्यथा त्या व्यक्तीस जे मिळण्याचा हक्क असेल त्या निवृत्तिवेतनाची रक्कम ही तिला कलम ३ अन्वये जे मिळण्याचा हक्क आहे त्या निवृत्तिवेतनाच्या रकमेएवढी किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास अशा व्यक्तीस त्या कलमाखाली कोणतेही निवृत्ति-वेतन मिळण्याचा हक्क असणार नाही, आणि

(दोन) अशा कायद्यानुसार किंवा अन्यथा त्या व्यक्तीस जे मिळण्याचा हक्क असेल त्या निवृत्तिवेतनाची रक्कम ही तिला कलम ३ अन्वये जे मिळण्याचा हक्क आहे त्या निवृत्तिवेतनाच्या रकमेपेक्षा कमी असेल तर अशा व्यक्तीस त्या कलमाखाली एरवी जे निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क असेल त्या निवृत्तिवेतनाची रक्कम जेवढ्या रकमेने कमी पडत असेल तेवढीच रक्कम त्या कलमानुसार निवृत्तिवेतन म्हणून मिळण्याचा हक्क राहील.

नियम व आदेश करण्याची शक्ती.

५. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासनाला नियम किंवा आदेश करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या सामान्यतेत बाध न येऊ देता अशा नियमांत किंवा आदेशांत पुढीलपैकी कोणत्याही गोष्टींबाबत तरतूद करता येईल :—

(अ) ज्या नमुन्यात व ज्या प्राधिकरणाकडे निवृत्तिवेतनाचा अर्ज करण्यात येईल तो नमुना व ते प्राधिकरण,

(ब) निवृत्तिवेतनाच्या अर्जाबरोबर सादर करावयाची प्रमाणपत्रे,

(क) निवृत्तिवेतन घेण्याच्यावेळी करावयाची प्रतिज्ञापने,

(ड) या अधिनियमाची अंमलबजावणी व कार्यान्वयन नीटपणे होण्यासाठी आवश्यक अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) या कलमाखाली करावयाचा कोणताही नियम किंवा आदेश हा कलम २, खंड (१) याच्या उपखंड (अ) मध्ये निर्देश केलेल्या तारखेपेक्षा लवकरची नसेल अशा कोणत्याही तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने असेल असा करता येईल.

(४) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम किंवा आदेश हे, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येतील.

(५) या कलमाखाली केलेल्या नियमांचा व आदेशांचा प्रभाव हा ते जणू या अधिनियमांत अधिनियमित केले असल्याप्रमाणे राहील.

निवृत्ति-वेतनाशी संबंधित प्रश्नांवरील निर्णय.

६. एखादी व्यक्ती निवृत्तिवेतनाची हक्कदार आहे किंवा नाही याविषयी किंवा निवृत्तिवेतनाच्या रकमेविषयी किंवा या अधिनियमाखाली तिला ज्या मुदतीकरिता निवृत्तिवेतन मिळण्याचा हक्क असेल त्या मुदतीविषयी कोणताही संशय किंवा वाद उद्‌भवल्यास ती बाब विचारार्थ राज्य शासनाकडे पाठवण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम राहील.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,

भाषा संचालक,

महाराष्ट्र राज्य.

४२९

MAHA

THE MAHARASHTRA
JURISDICTION AND AMEND... ECUNIARY

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ६ ऑक्टोबर १९७७ रोजी मिळाली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLVI OF 1977

## AN ACT TO PROVIDE FOR THE ENHANCEMENT OF PECUNIARY JURISDICTION OF THE CIVIL COURT IN THE STATE OF MAHARASHTRA AND CERTAIN OTHER MATTERS.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १४ ऑक्टोबर १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.

**महाराष्ट्र राज्यातील दिवाणी न्यायालयांच्या आर्थिक अधिकारितेत वाढ करण्यासाठी व इतर विवक्षित बाबींसाठी तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील दिवाणी न्यायालयांच्या आर्थिक अधिकारितेत वाढ करण्यासाठी व यात यापुढे दिलेल्या इतर विवक्षित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र दिवाणी न्यायालये (आर्थिक अधिकारितेत वाढ करणे व सुधारणा) अधिनियम, १९७७ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील त्या तारखेस अंमलात येईल.

**सन १९४८ चा मुंबई अधिनियम ४० याच्या कलम ३ ची सुधारणा.**

२. मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ (यात यापुढे ज्याचा "शहर दिवाणी न्यायालय अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, "दहा हजार रुपयांहून" या शब्दांऐवजी "पन्नास हजार रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

४८
चा
ाई
ध-
म,
०.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम ४० याचे कलम ४ वगळणे.

३. शहर दिवाणी न्यायालय अधिनियमाचे कलम ४ वगळण्यात येईल.

सन १८८२ चा अधिनियम पंधरा याच्या कलम १४ ची सुधारणा

४. इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८२ (यात यापुढे ज्याचा "इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्याच्या कलम १४ मध्ये,— १८८२ चा अधिनियम, १५.

(अ) "वीस रुपयांहून" या मजकुराऐवजी, "शंभर रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) स्पष्टीकरण वगळण्यात येईल ;

(क) समास टीपेमधील "वीस रुपयांहून" या मजकुराऐवजी "शंभर रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८२ चा अधिनियम पंधरा याच्या कलम १८ ची सुधारणा.

५. इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम याच्या कलम १८ मध्ये, "तीन हजार रुपयांपेक्षा" हे शब्द ज्या ठिकाणी येतात त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "दहा हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८८२ चा अधिनियम पंधरा याच्या कलम २० ची सुधारणा।

६. इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम याच्या कलम २० मध्ये, "तीन हजार रुपयांपेक्षा" हे शब्द ज्या ठिकाणी येतात त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "दहा हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८८२ चा अधिनियम पंधरा याच्या कलम २२ ची सुधारणा.

७. इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम याच्या कलम २२, खंड (क) मध्ये, "तीन हजार रुपयांदेक्षा" या शब्दांऐवजी "दहा हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८८२ चा अधिनियम पंधरा याच्या कलम ६३ ची सुधारणा.

८. इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम याच्या कलम ६३ मध्ये व त्याच्या समास टीपेत "दोन हजार रुपयांपेक्षा" या शब्दांऐवजी "पाच हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८८२ चा अधिनियम पंधरा याच्या कलम ७१ ची सुधारणा.

९. इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम, याच्या कलम ७१ मध्ये,—

(अ) खंड (अ) मध्ये, "रुपयातील दोन आणे" या शब्दांऐवजी "रुपयातील पंधरा पैसे" हे शब्द दाखल करण्यात येतील;

(ब) खंड (ब) मध्ये, "बासष्ट रुपये आठ आणे इतकी रक्कम व पाचशे रुपयांहून अधिक असणाऱ्या अशा रकमेवर किंवा किंमतीवर रुपयास एक आणा" या मजकुराऐवजी "पंचाहत्तर रुपये इतकी रक्कम व पाचशे रुपयांहून अधिक असणाऱ्या अशा रकमेवर किंवा किंमतीवर रुपयास दहा पैसे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

323



१८८७ चा अधि-नियम ९.

सन १८८७चा अधिनियम ९ याच्या कलम १५ ची सुधारणा.

१०. प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ (यात यापुढे ज्याचा "प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, त्याच्या कलम १५ मध्ये,—

(अ) पोट-कलम (२) मध्ये, "पाचशे रुपयांपेक्षा" या शब्दांऐवजी "दोन हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील ;

(ब) पोट-कलम (३) मध्ये, "दोन हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी "पाच हजार रुपयांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८७चा अधिनियम ९ याच्या कलम २८ ची सुधारणा.

११. प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियमाच्या कलम २८, पोट-कलम (२) मध्ये, "दहा हजार रुपये" या शब्दांऐवजी "वीस हजार रुपये" हे शब्द दाखल करण्यात येतील.

१८६९ चा अधि-नियम १४.

सन १८६९चा अधिनियम १४ याच्या कलम १६ ची सुधारणा.

१२. मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम, १८६९ (यात यापुढे ज्याचा "मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम १६ मधील,—

(अ) "पंधरा हजार रुपये" या शब्दांऐवजी, "चाळीस हजार रुपये" हे शब्द दाखल करण्यात येतील;

(ब) "दहा हजार रुपयांपेक्षा" या शब्दांऐवजी "पंचवीस हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८६९चा अधिनियम १४ याच्या कलम २४ ची सुधारणा.

१३. मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियमाच्या कलम २४ मधील,—

(अ) "दहा हजार रुपयांपेक्षा" हे शब्द प्रथमच आढळून येतात तेथे त्याऐवजी "पंचवीस हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील ;

(ब) परंतुकामधील "दहा हजार ते पंधरा हजार" या शब्दांऐवजी "पंचवीस हजार ते चाळीस हजार" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८६९ चा अधिनियम १४ याच्या कलम २६ ची सुधारणा.

१४. मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम याच्या कलम २६ मधील, "दहा हजार रुपयांपेक्षा" या शब्दांऐवजी "पंचवीस हजार रुपयांपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८६९चा अधिनियम १४ याच्या कलम २८ ची सुधारणा.

१५. मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम याच्या कलम २८, पोट-कलम (१) मधील,—

(अ) "एक हजार पाचशे रुपये" या मजकुराऐवजी, "तीन हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "पाचशे रुपये" हे शब्द दुसऱ्या वेळेस ज्या ठिकाणी आले असतील तेथे त्याऐवजी, "एक हजार पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८६९चा अधिनियम १४ याच्या कलम २८-अ ची सुधारणा.

१६. मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियमाच्या कलम २८-अ, पोट-कलम (२) मधील "दहा हजार रुपये" या शब्दांऐवजी "पंचवीस हजार रुपये" हे शब्द दाखल करण्यात येतील.

सन १८६९ चा अधिनियम १४ याच्या कलम ३५ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

१७. मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियमाच्या कलम ३५ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

जिल्हा न्यायाधीशाचे पद तात्पुरते रिकामे होणे.

"३५. जिल्हा न्यायाधीश मरण पावल्यास किंवा रजेवर गेल्यामुळे तो त्याच्या जिल्ह्यामध्ये अनुपस्थित राहिल्यास किंवा तो काम करण्यास असमर्थ झाल्यास, जिल्ह्याच्या सहन्यायाधीशांपैकी प्रथम दर्जाचा असलेला सहन्यायाधीश, किंवा कोणत्याही सहन्यायाधीशाच्या अनुपस्थितीत, जिल्ह्याच्या सहायक न्यायाधीशांपैकी प्रथम दर्जाचा असलेला सहायक न्यायाधीश, किंवा कोणत्याही सहन्यायाधीशाच्या आणि सहायक न्यायाधीशाच्या अनुपस्थितीत, जिल्ह्याच्या दिवाणी न्यायाधीशांपैकी प्रथम दर्जाचा असलेला दिवाणी न्यायाधीश, त्याच्या नेहमीच्या अधिकारितेमध्ये व्यत्यय न येऊ देता, जिल्हा न्यायालयाचा कार्यभार ग्रहण करील आणि अशा प्रकारे कार्यभार धारण केलेला असताना तो, वाद आणि अपिले दाखल करून घेणे, वाद प्रतिवाद ऐकून घेणे, अंमलबजावणी विषयक आदेशिका व रिट व तत्सम गोष्टी मिळवणे यांसंबंधातील जिल्हा न्यायाधीशाची कर्तव्ये पार पाडील व जिल्हा न्यायाधीशापुढे दाखल करण्यात आलेले किंवा दाखल करण्यात येतील किंवा त्याच्यापुढे प्रलंबित असतील असे कोणतेही तातडीचे वाद, अपिले आणि इतर कार्यवाही (कोणत्याही विशेष अधिनियमांखालील कोणतेही अर्ज किंवा निर्देश यांसह) देखील निकालात काढील. अशी कर्तव्ये पार पाडणारा आणि अशा शक्तींचा वापर करणारा न्यायाधीश हा जिल्ह्याचा प्रभारी पदनिर्देशित सहन्यायाधीश, सहायक न्यायाधीश किंवा यथास्थिति दिवाणी न्यायाधीश असेल आणि तो, जिल्हा न्यायाधीशाच्या पदावर यथोचितरीत्या नेमणूक केलेला अधिकारी त्या पदावर परत रुजू होईपर्यंत किंवा तो त्या पदाचा कार्यभार ग्रहण करीपर्यंत असा कार्यभार धारण करण्याचे चालू ठेवील.".

सन १८६९चा अधिनियम १४ याच्या कलम ३६ ची सुधारणा.

१८. मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियमाच्या कलम ३६ मध्ये, "कोणत्याही जिल्हा न्यायाधिशास", या मजकुरानंतर, "कोणताही सहन्यायाधीश उपलब्ध नसेल अशा बाबतीत" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

व्यावृत्ती.

१९. पूर्वोक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमात या अधिनियमाद्वारे केलेल्या सुधारणांचा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस कोणत्याही न्यायालयात दाखल केलेल्या व त्याच्याकडे प्रलंबित असलेल्या दिवाणी स्वरूपाच्या कोणत्याही वादांच्या, अपिलांच्या किंवा इतर कार्यवाहीच्या बाबतीत परिणाम होणार नाही व त्याबाबतीत त्या लागू असणार नाहीत व अशी कार्यवाही जणू काही हा अधिनियम संमत करण्यात आलेला नसल्याप्रमाणे त्या न्यायालयाकडून चालू ठेवण्यात येईल व निकालात काढण्यात येईल; तसेच या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही हुकुमनाम्याच्या किंवा दिलेल्या आदेशाच्या बाबतीतील दिवाणी स्वरूपाचे कोणतेही अपील, पुनरीक्षण अर्ज किंवा इतर कार्यवाही जणू काही हा अधिनियम संमत करण्यात आलेला नसल्याप्रमाणे, अशा प्रारंभापूर्वी अशी कार्यवाही करण्यास सक्षम असणाऱ्या न्यायालयापुढे दाखल करण्यात येईल व तिची सुनावणी करण्यात येईल व ती निकालात काढण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.